MHAU07001572025

नियमीत दिवाणी दावा क्र. २९७/२०२५
**रामभाभी भाऊसाहेब सुकासे Vs. प्रकाश भानुदास निकम व इतर**
नि.क्र.९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश क्रम ६ नियम १७ तसेच आदेश १ नियम १० अन्वये पक्षकार म्हणुन प्रतिवादींना समाविष्ठ करण्याकरीता व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. **अर्जातील कथने खालीलप्रमाणे आहे:-**

प्रस्तुत दावा वाद मिळकतींचे वाटप होऊन मिळण्यासाठी, वाद मिळकतीबाबत झालेली नोंदणीकृत खरेदीखते वादींवर बंधनकारक नाही हे जाहीर होऊन मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रकरण काही प्रतिवादींच्या जबाबासाठी प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१७ ते १९ यांनी वाद मिळकतीचा काही हिस्सा विक्री केलेला आहे. वादीने त्यांना पक्षकार म्हणुन समाविष्ठ केलेले आहे. मात्र नजर चुकीने प्रतिवादी क्र. २५ कल्याण रामराव निकम यांनी व वादीची आई मयत सिताबाई निकम हिने अशोक कडुबाळ दुबीले यांच्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीखता विषयी दाद मागण्याचे राहुन गेले आहे.

३. त्या अनुषंगाने वादी हा दाव्यातील शिर्षक रकान्यात प्रतिवादी क्र. २७ नंतर प्रतिवादी क्र. २८ म्हणुन, **" अशोक कडुबाळ दुबिले वय-५६ वर्ष, धंदा शेती रा. शिवपुर पो. शेंदुरवादा ता. गंगापुर जि. औरंगाबाद"** अशी प्रस्तावित दुरुस्तीची मागणी करत आहे. त्याच प्रमाणे दाव्याच्या परिच्छेद क्र. ८ नंतर ८-अ म्हणुन, **"८-अ असे की, दावा मिळकत गट क्र. १२८ पैकी प्रतिवादी क्र. २५ कल्याण याने २० आर व मयत सिताबाई भानुदास निकम यांनी १४ आर अशी एकुण ३४ आर शेत जमीन प्रतिवादी क्र. २८ अशोक कडुबाळ दुबिले यांचे हक्कात दिनांक १४.०६.२००५ रोजी खरेदीखत क्र. २५५२/२००५ अन्वये बेकायदेशिररित्या व वादीच्या संमती शिवाय विक्री केलेले असल्याने ते खरेदीखत क्र.**

**२५५२/२००५ हे देखील वादीवर बंधनकारक नसल्याचे जाहिर करुन मिळणे आवश्यक आहे"**, अशी दुरुस्ती वादी करु पहात आहे. त्याचप्रमाणे दाव्याच्या परिच्छेद क्र. १२ मधील शेवटच्या उपपरिच्छेदा नंतर अजुन एक उपपरिच्छेद म्हणुन, **" वादीने गट क्र. १२८ मधील प्रतिवादी क्र. २८ अशोक दुबिले यांचे हक्कातील खरेदीखत क्र. २५५२/२००५ हे देखील वादीवर बंधनकारक नसल्याचे जाहिर करुन मागितले असून वादी त्या खरेदीखतात पक्षकार नसल्याने वादीने त्या मागणीचे मुल्यांकन रक्कम रुपये १०००/- रुपये २००/- कोर्ट फिस जमा केले आहे"** त्याचप्रमाणे दाव्यातील विनंती रकान्यातील विनंती क मध्ये, **"1659/2004"** या खरेदीखताच्या क्रमांकानंतर " **२५५२/२००५**" अशी दुरुस्ती वादी करु पहात आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. या उलट उभयपक्षातील वाद कायम स्वरुपी संपुष्टात आणण्यात मदतच होणार आहे. सबब अर्ज मंजुर करण्याची विनंती वादीने केली आहे.

## ३. प्रतिवादींचा लेखी जबाब

प्रतिवादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, अर्जात नमुद केलेले कारण योग्य नाही. अर्ज मुदतीत नाही. सदर अर्जाद्वारे वादी जी प्रस्तावित दुरुस्ती करु पहात आहे, त्याचे ज्ञान वादीस दावा दाखल करते वेळे होते. उपरोक्त कारणास्तव अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

**४.** खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे:-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या संरचनेत बदल होतो काय? | ….. नकारार्थी |
| २. | प्रस्तावित दुरुस्तीत दाव्याच्या निर्णयासाठी आवश्यक आहे काय ? | …. होकारार्थी |
| ३. | कोणता आदेश ? | … अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिंमासा

**५.** वादींतर्फे विधीज्ञ श्री. डी.के.तारु यांचा युक्तीवाद ऐकला. तर प्रतिवादींतर्फे विधीज्ञ

श्री के.एस. ठोंबरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत:-**

**६.** मुद्दा क्रमांक १ व २ यांचे निष्कर्ष एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची कारणमिंमासा एकत्रीतच नोंदविले आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादी हा वादमिळकतीच्या खरेदीदारांना व त्या अनुषंगाने क्रमप्राप्त असलेला आवश्यक त्या खरेदीखताची दाद दाव्यात समाविष्ठ करु पहात आहे. प्रतिवादींचे ऐवढेच कथन आहे की, सदर प्रस्तावित दुरुस्ती बाबत वादीला दावा दाखल करते वेळे पुर्ण माहिती होती. या अनुषंगाने खरोखरच वादीला दावा दाखल करण्याआधी प्रस्तावित दुरुस्तीची माहिती होती किंवा नाही हे पहाणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वाद मिळकत गट क्र. १२८ पैकी प्रतिवादी क्र. २५ याने २० आर व मयत सिताबाई भानुदास निकम यांनी १४ आर एकुण ३४ आर शेत जमीन प्रतिवादी क्र. २८ ला नोंदणीकृत खरदीखता अन्वये दि. १४.०६.२००५ रोजी विक्री केली आहे. मान्यत: प्रस्तुतचा दावा हा सन २०१९ मध्ये दाखल झालेला आहे. याचाच अर्थ उपरोक्त प्रमाणे विक्री व्यवहार हा दावा दाखल करते वेळी व दावा दाखल झाल्यानंतर, झालेला नसुन दावा दाखल करण्या आधीच झालेला आहे. सबब सदर व्यवहाराची पुर्ण माहिती वादीला होती असे अनुमान काढणे योग्य ठरते. आता, प्रस्तावित दुरुस्ती दाव्याच्या निर्णयासाठी आवश्यक आहे किंवा नाही हे पहाणे आवश्यक आहे.

**७.** या अनुषंगाने प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर दावा हा वाद मिळकतीचे वाटप होऊन तसेच वाद मिळकतीच्या अनुषंगाने झालेले खरेदीखते बेकायदेशिर असुन वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहिर होऊन मिळण्यासाठी, निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात वादीचे असे कथन आहे की, वाद मिळकती हया वडीलोपार्जित मिळकती आहेत. विशेषत: वाद मिळकत गट क्र. १२८ ही वडीलोपार्जित शेत जमीन विकुन खरेदी केलेली आहे. त्यामुळे सदर मिळकत एकत्र हिदु कुटुंबाची वडीलोपार्जित मिळकत आहे. वादीचे भाउ नामे संपत व दौलत यांनी त्याचे वडील भानुदास मयत झाल्यानंतर बहिणींची जबाबदारी पार पाडण्यास टाळाटाळ केली. वादीने व त्याच्या बहिणींनी वाद मिळकतीतील हिस्सा भाऊ संपत व दौलत

यांच्याकडे मागितला असता त्यांनी नकार दिला. महसुल कागदपत्रे काढल्यानंतर वाद मिळकतीच्या हक्कात फेरबदल केल्याचे वादीस लक्षात आले. थोडक्यात वादीच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत वडीलोपार्जित असुन त्यात त्यांचा कायदेशिर हिस्सा आहे. त्यात त्याने वाद मिळकती संबंधी करुन देण्यात आलेली खरेदीखते त्याच्यावर बंधनकारक नाहीत अशी मागणी केलेली आहे. अशा परिस्थीतीत वादी करु पहात असलेली उपरोक्त दुरुस्ती आवश्यक आहे. या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. याउलट दाव्याचा निकाल गुणांवर लागण्यास मदतच होणार आहे.

८. प्रस्तुत दाव्याच्या सुनावणीस प्रारंभ झालेला नाही. प्रस्तुतचे प्रकरण काही प्रतिवादींच्या लेखी जबाबासाठी प्रलंबीत आहे. याचाच अर्थ दाव्याच्या सुनावणीस अदयाप प्रारंभ झालेला नाही. आधीच उल्लेखीत केल्याप्रमाणे सदरची दुरुस्ती ही दाव्याच्या अंतीम निर्णयासाठी आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यातील दुरुस्ती दाव्याच्या सुनावणीस प्रारंभ होण्यापुर्वी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात दाव्याच्या सुनावणीस अदयाप प्रारंभ झालेला नाही. सबब अर्ज मंजुर करणे उचित होईल असे माझे मत आहे. उपरोक्त कारणमिंमासेवरुन मी मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष नकारार्थी व मुद्दा क्रमांक २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ३ बाबत:-</u>**

**९.** मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष उपरोक्तप्रमाणे नोंदविल्यामुळे मुद्दा क्रमांक ३ साठी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादींनी प्रस्तावित दुरुस्ती आदेश दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करावी व दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.
३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.
४. दोन्ही विधीज्ञांनी आदेशाची नोंद घ्यावी

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.09.22 15:05:32 +0000

(आर. एन. पाठक)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
गंगापूर

दिनांक:- १८.०९.२०२५

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba Age<br>Stenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 18/09/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 18/09/2025 |
| Judgment uploaded on | : 22/09/2025 |